महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३१० वा | दिनांक : ०९/१०/२०२५ | वार : गुरूवार

## परंपरा आणि सभ्यता भाजपने गुंडाळून ठेवली : हर्षवर्धन सपकाळ



**मुंबई** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतेच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन केले. कमळाच्या आकाराच्या डिझाइन असलेल्या या टप्प्यात एक टर्मिनल आणि एक धावपट्टी असून, त्याची क्षमता दरवर्षी दोन कोटी प्रवाशांना हाताळण्याची आहे; येथून नियमित उड्डाणे डिसेंबरमध्ये सुरू होतील. दरम्यान, या कार्यक्रमावरून कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी भाजपवर टीका केली आहे.

कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, संकेत, राजकीय संकेत, सभ्यतेचे संकेत, आपली संस्कृती, आपली परंपरा आणि सभ्यता या सगळ्या गोष्टी भारतीय जनता पक्षाने गुंडाळून ठेवलेल्या आहेत. आम्ही देशाचे मालक आहोत आणि 'हम करे सो कायदा' असे भाजप वागत आहेत आणि आजच्या कार्यक्रमातही त्याचे दर्पण पाहायला मिळाले असल्याची टीका सपकाळ यांनी केली आहे.


हर्षवर्धन सपकाळ यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यासोबत आघाडी न करण्याचे म्हटले होते. यावर पत्रकाराने विचारलेल्या प्रश्नावर उत्तर देताना ते म्हणाले, इंडिया आघाडीचे गठन हे राष्ट्रीय स्तरावर झालेले आहे. त्यामुळे या संदर्भात राष्ट्रीय पातळीवरून प्रतिक्रिया येईल. मात्र, यातला मुळ मुद्दा जो आहे की, इंडिया आघाडी का गठित झाले? तर भाजपची जी दंडेलशाही आहे आणि हुकूमशाही आहे ती विसर्जित करून लोकशाही आणण्यासाठी इंडिया आघाडी ही संविधानाचे संवर्धन आणि संरक्षण करण्यासाठी बनलेली आहे. या मूल्यांच्या अनुषंगाने ज्या ठिकाणी जर कोणाशी संपर्क साधला असेल तर तिथूनच यावर योग्य वेळी योग्य निर्णय दिला जाईल.

मनोज जरांगे यांनी कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांच्याविषयी वापरलेल्या भाषेवर प्रश्न विचारला असता हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, अनावश्यक वक्तव्य होते आणि अशा वक्तव्यांचा सातत्याने उच्चार करून आणि गरज नसलेल्या माणसाचा उद्धार करून जातीय तेढ आणि एकंदरीत महाराष्ट्रातले जी सद्भावना आहे ती लयास नेण्याचा कोणीही प्रयत्न करू नये. मराठा आरक्षणाच्या अनुषंगाने जे काही शेलक्या भाषेत बोलले जाते त्याचा आम्ही निषेधच केलेला आहे. त्यांनी 'लाल्या' वगैरे असे शब्द वापरू नयेत आणि आम्ही त्याचा निषेधच करतो. वास्तविक पाहता मराठा आरक्षण मिळाले पाहिजे आणि ते मिळण्यासाठी विधानसभेने विधानपरिषदेने आढावा घेतला आहे. तसेच हा मुद्दा भाषणबाजी करून सुटणार नाही.

पुढे बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, देशभरातील आरक्षणाच्या प्रश्नावर रामबाण उपाय जो आहे तो केवळ आणि केवळ राहुल गांधी यांनी काढलेला आहे. मराठा समाजासोबत इतर समाजांना आरक्षण देण्याच्या अनुषंगाने जो फॉर्म्युला काढला आहे तो राहुल गांधी यांनी काढलेला आहे. राहुल गांधी यांनी जातीनिहाय जनगणना करून समाजाचे सीटी स्कॅन काढत असताना जातीनिहाय जनगणनेच्या अनुषंगानेच सर्वांना आरक्षण द्यावे ही स्वागतार्ह भूमिका राहुल गांधी घेतात आणि तरी देखील त्यांच्या विषयी असे शब्द वापरले जात असतील तर हे अतिशय दु:खद आहे.

ओबीसी विरुद्ध मराठा असा संघर्ष करायचे कारण नाही. ओबीसींचा टक्का वाढला पाहिजे आणि ५० टक्के आरक्षणाची मर्यादा वाढवली पाहिजे. जाती-धर्म किंवा माणसामाणसांत समाज विभक्त करणे चुकीचे आहे. "कुठे नेऊन ठेवलंय महाराष्ट्र माझा?" असा प्रश्न आहे. सत्ताधारी निवडणुका जवळ आल्यावर जातीवाद का वाढवतात? स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका जवळ आल्यावर जातीवाद कसा निर्माण होतो? सत्ताधाऱ्यांनी कोणताही राजकीय डाव न करता ताबडतोब जातीनिहाय जनगणना करावी आणि त्यानुसार आरक्षण द्यावे, असे आवाहन हर्षवर्धन सपकाळ यांनी सरकारला केले आहे.

## मी समाजाची भूमिका मांडायला हरकत नाही : छगन भुजबळ



**शिर्डी** : राष्ट्रवादी कॉँग्रेसमधील मंत्री छगन भुजबळ यांच्या भूमिकेवरून अजित पवार नाराज असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सातत्याने सुरू असते. त्यातच, मंगळवारी रात्री हॉटेल ट्रायडंट येथे अजित पवारांच्या उपस्थितीत झालेल्या पक्षाच्या आमदार आणि पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत हे नाराजीनाट्य उघडपणे पाहायला मिळाले आणि अजित पवारांनी आपली नाराजी जाहीर केल्याचे बोलले जात आहे.

मात्र, या नाराजीसंदर्भात बोलताना मंत्री छगन भुजबळ यांनी आपली आरक्षण लढ्यासंदर्भातील स्पष्ट भूमिका आपण यापूर्वीच अजित पवारांना सांगितल्याचे स्पष्ट केले. तसेच, अजित पवार मला काहीही बोलले नाहीत, असेही त्यांनी नमूद केले.

छगन भुजबळ म्हणाले, अजित पवार मला काही बोलले नाहीत, मला बोलायचे असते तर ते थेट बोलले असते. मी अजित पवारांना स्पष्ट बोललो आहे, मी ३५ वर्षांपासून समाजासाठी काम करतोय. मी शिवसेना त्याच कारणाने सोडली होती. ते काम मी कुठेही गेलो तरी चालूच राहणार, त्यास मला कुणाचेही बंधन नाही. मी समाजाची भूमिका मांडायला हरकत नाही, असे भुजबळ म्हणाले. ते शिर्डी येथे पत्रकारांशी बोलत होते.

तुम्ही लोक काय त्याच्या नादी लागलात?

मनोज जरांगे यांनी अजित पवारांनी साप पाळले असल्याचे वक्तव्य केले होते. यावर प्रतिक्रिया देताना छगन भुजबळ यांनी जरांगेंवर हल्लाबोल केला आहे. तुम्ही लोक काय त्याच्या नादी लागलात? त्याला काही काम धंदा नाही, त्याला शिक्षण आहे का? काही माहीत आहे का? मला बाळासाहेब ठाकरेंनी नेता केला, ५७ वर्षे झाले मला. मी मुंबईचा दोनदा महापौर झालो. मंडल आयोगामुळे कॉंग्रेसमध्ये गेलो, त्याला राजकारणात कोण कधी आले माहीत आहे का? १९९१ साली मी कॅबिनेट मंत्री झालो, जे आज मंत्री आहेत तेव्हा कोणीही नव्हते, असा पलटवार भुजबळ यांनी केला आहे.

पुढे बोलताना छगन भुजबळ म्हणाले, मराठा समाजाला इडब्लूएसचे आरक्षण दिल्यानंतर सर्व प्रश्न मिटले होते. मात्र, हा दारुवाले आणि वाळूवाल्यांचा लिडर, हा लढाया, मारामाऱ्या करायला लिडरशिप करतोय. देशातले वातावरण बिघडवण्यासाठी कारणीभूत झालाय. त्याला अक्कलच नाही, त्याच्याकडून सुसंस्कृतपणाची अपेक्षा कशी करू शकता? असा सवालही भुजबळांनी उपस्थित केला.

दरम्यान, आनंदाचा शिधा सरकारने बंद केला आहे. यावरून विरोधकांनी महायुती सरकारवर टीका केली होती. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे महत्त्व कमी करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आनंदाचा शिधा योजना बंद केल्याचा आरोप करण्यात आला आहे. यावर छगन भुजबळ म्हणाले, शेतकऱ्यांना साडे ३१ हजार कोटींचे पॅकेज द्यावे लागले आहे. मागच्या वर्षीपासून ४०-४५ हजार कोटींची लाडकी बहीण योजना सुरू आहे. ओढाताण कमी झाली की आनंदाचा शिधा परत सुरू करू, असे भुजबळ यांनी म्हटले आहे.

# पूरग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना दिलासा : परीक्षा शुल्क होणार माफ

**मुंबई** : राज्यातील अनेक भागांमध्ये अतिवृष्टीमुळे पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. या पुराच्या पाण्यात अनेकांचे घरं अक्षरशः वाहून गेली आहेत. तर अनेकांचे संसार उघड्यावर पडले आहेत. शेतकऱ्यांचे तर नुकसान झालेच, परंतु विद्यार्थ्यांचे देखील मोठे नुकसान झाले आहे.

कागदपत्रे, शैक्षणिक साहित्य पाण्यात वाहून गेलेल्या विद्यार्थ्यांना चांगलाच फटका बसला आहे. याच पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या सोबतच शैक्षणिक संस्थांनीही सामाजिक जबाबदारी म्हणून विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले आहे.

चंद्रकांत पाटील म्हणाले, अनेक विद्यार्थ्यांचे साहित्य आणि शैक्षणिक साधने पुरामुळे नष्ट झाली आहेत. त्यामुळे महाविद्यालये, विद्यापीठे आणि खाजगी शिक्षण संस्थांनी विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके, गणवेश अशा स्वरूपात सामाजिक कर्तव्य म्हणून मदत करावी. यामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या विद्यार्थ्यांना दिलासा मिळेल आणि त्यांचे शिक्षण अखंडितपणे सुरू राहील, असा विश्वास देखील त्यांनी यावेळी व्यक्त केला आहे.

मंत्रालयात राज्यातील पूरग्रस्त भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणींचा आढावा घेण्यासाठी चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. या बैठकीत चंद्रकांत पाटील यांनी याबाबतचा निर्णय घेतला आहे. या बैठकीला उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, तंत्रशिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर, उपसचिव प्रताप लुबाळ, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. अजय भामरे, तसेच राज्यातील विविध महाविद्यालयांचे प्राचार्य आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते.

दरम्यान, मागच्या महिन्यात बारावी बोर्ड परीक्षेचा फोरम भरण्याचा शेवटचा दिवस हा ३० सप्टेंबर होता. अंतिम तारीख पुढे ढकलण्याचे निर्देश देखील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले होते. त्यानुसार मंत्री दादा भुसे यांनी याबाबतचा निर्णय जाहीर केला होता. पुराचा फटका हा विद्यार्थ्यांना चांगलाच बसला असून विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जाऊ नये म्हणून सरकारकडून सर्वतोपरी मदत केली जात असल्याचे दिसून येत आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०९ ऑक्टोबर २०२५


## अभिनंदन संदेश



**छत्रपती संभाजीनगर :** माननीय आयुक्त तथा प्रशासक श्री. जी. श्रीकांत सर यांच्या संकल्पनेतून आयोजित "आम्हाला खेळू द्या" या उपक्रमांतर्गत आयोजित जिल्हास्तरीय महानगरपालिका हद्दीतील व्हॉलीबॉल स्पर्धेत, मुकुंदवाडी केंद्र अंतर्गत चिखलठाणा महानगरपालिका विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी 17 वर्षाखालील गटात उपांत्यपूर्व (क्वार्टर फायनल) फेरीपर्यंत मजल मारत उल्लेखनीय कामगिरी केली आहे .

*या उत्कृष्ट कामगिरीबद्दल विद्यार्थ्यांचे अभिनंदन श्री. अंकुश पांढरे सर ( उपआयुक्त, शिक्षण विभाग ) श्री. संजीव प्रसाद बालया सर (क्रीडा अधिकारी ) श्री. गणेश दांडगे सर (नियंत्रण अधिकारी) श्री. ज्ञानदेव सांगळे सर (समग्र शिक्षण अभियान अधिकारी) श्री. भरत तीनगोटे सर ( शिक्षण अधिकारी) यांनी करून विद्यार्थ्यांचे मनोबल उंचावले* .

शाळेचे मुख्याध्यापक श्री. शिंदे सर आणि सहशिक्षक श्री. पठाण सर यांनी दिलेले योग्य मार्गदर्शन तसेच क्रीडा प्रशिक्षक श्री. इरफान सय्यद सर यांचे कठोर परिश्रम व प्रभावी प्रशिक्षण यांच्या जोरावर विद्यार्थ्यांनी ही उत्कृष्ट कामगिरी साध्य केली .

सर्व खेळाडूंना पुढील स्पर्धांसाठी हार्दिक शुभेच्छा.

## डॉ. प्रभाकर शेळके यांना राज्यस्तरी ग्रामीण नाट्य साहित्य पुरस्कार



**नेवासा (प्रतिनिधी) :** ता नेवासा जि.अहिल्यानगर येथील श्री संत किसन महाराज सुडके ग्रामीण विकास प्रतिष्ठानचा नाट्यलेखन साहित्य जीवन गौरव पुरस्कार जालना येथील ग्रामीण कवी कथाकार नाट्यलेखक डॉ प्रभाकर शेळके यांच्या 'राजकारण घुसलं घरात' या ग्रामीण नाट्यलेखनास श्री संत किसन महाराज सुडके ग्रामीण विकास प्रतिष्ठान संतनगर कांगोणी ता. नेवासा जि.अहिल्यानगर या संस्थेचे अध्यक्ष हभप. बाळकृष्ण महाराज सुकडे,मा.खासदार निलेश लंके, माजी आमदार पांडुरंग जी अंभग,हभप मुंढे महाराज,हभप भोपळे महाराज, हभप दिघे महाराज, सतिश थोरात, तुकाराम मिसाळ यांच्या शुभहस्ते सन्मानपत्र,सन्मानचिन्ह,महावस्त्र, प्रदान करून सन्मान करण्यात आला.

राज्यातील कवी कथाकार नाट्यलेखक, संतसाहित्यिक यांच्या कलाकृतीचा सन्मान करण्यात आला.यात जालना जिल्ह्याचा हा सन्मान आहे.त्यांच्या या यशाबद्दल समाजसेवक रमेशजी देहडकर, चित्रकार श्रीधर अंभोरे, मसाप अध्यक्ष रवींद्र तौर (तात्या) बाळासाहेब तनपुरे,राम गायकवाड,कवी कैलास भाले,डॉ सुहास सदावर्ते, सुनील लोणकर, भीमराव पदमे, रामभाऊ शेळके, दौलतराव हिरेकर, कवी मनीष पाटील, कवी नारायण खरात, प्रा.राजेंद्र भोसले, शफिक सय्यद, तुकाराम पवार, विठ्ठल ठेपले, किशोर राऊत, करूण काफरे, अनिरुद्ध पावसे,डॉ श्रीनिवास सातभाई, डॉ यशवंत सोनुने, ॲडव्हेट विश्वनाथ गायकवाड, प्रल्हाद टकले, प्रल्हाद रेडे राजेंद्र देशमुख, उध्दव अधुडे, बाबासाहेब माकोडे, इ. मान्यवरांनी शेळके यांचे अभिनंदन केले.






## शिवछत्रपती महाविद्यालयात आई मेळाव्याचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शिवछत्रपती महाविद्यालयात सखी सावित्री समिती आयोजित "आई" मेळावा दि.१० ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी २ वाजता राजमाता जिजाऊ सभागृहात होणार आहे.

याप्रसंगी प्रमुख व्याख्याते छात्रसभा संरशक. विश्वमांगल्य सभा. च्या श्रीमती स्वाती ठोसर -चौधरी ह्या उपस्थितीत राहणार आहेत. या मेळाव्याचे अध्यक्ष प्राचार्य डॉ राजेंद्र पवार हे राहणार आहेत.

या मेळाव्याला सर्व विद्यार्थ्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन शिवछत्रपती महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा भरत वहाटूळे, डॉ संगीता राजमाने. पर्यवेक्षक डॉ अश्रूबा गवळी, प्रा राहुल पाटील यांनी केले आहे.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०९ ऑक्टोबर २०२५


# १३७ वी वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न

## स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेवर आधारित सामाजिक ध्येयवाद स्वीकारला पाहिजे. __ बी. बी. मेश्राम





**छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी)** : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने संस्थेचे कार्यालय 4, साकेत नगर, भावसिंगपुरा रोड, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र येथे "माझ्या जीवनाचे तात्विक अधिष्ठान." या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विधानाच्या 71 व्या वर्धापन दिनानिमित्त सदरील प्रासंगिक विषयावर 137 वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा 5 ऑक्टोबर 2025 ला संपन्न झाली.

फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, जनतेच्या अपेक्षेप्रमाणे जनतेचा आवाज हाच सर्वोच्च असतो, म्हणून त्याचा विचार केला पाहिजे. कुठल्याही व्यक्तीच्या वर्तनावरून त्याने स्वीकारलेले तत्वज्ञान काय असेल? हे सिद्ध होते. अहंकारातून आपली बर्बादी होत असताना सुद्धा माणसे राग, लोभ, मोह, माया, द्वेष आणि मत्सर या षडरिपूचा त्याग करायला तयार नाहीत. हिंदूंनी भगवदगीतेत व्यक्त केल्याप्रमाणे क्रमिक विषमतेवर आधारलेली जातिव्यवस्था स्वीकारल्याने तो त्यांच्या जीवनाचा मूलभूत नियम ठरला आहे. ज्यामुळे मानवतावादाचा ऱ्हास होत चालला आहे. पुनश्च मानवी जीवनाच्या उत्कर्षाकडे वळायचे असल्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्धाच्या तत्त्वज्ञानातून स्वीकारलेल्या स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या तत्वाचा आपण अंगीकार केला पाहिजे.

अर्थात नस्तिपक्षाला नाकारून अस्तिपक्षाचा स्वीकार केला पाहिजे. परिणामी नकारात्मकेकडून सकारात्मकतेकडे वळून मानवी जीवनाचा उत्कर्ष करता येईल. परंतु कुठल्याही तत्वाला विशिष्ट मर्यादेत अंगीकारले पाहिजे. ज्यात मानवी जीवनात बंधूभावाला सर्वोच्च स्थान दिले पाहिजे. जेणेकरून त्याचे इतर तत्त्वावर दुष्परिणाम होणार नाहीत. भारतीय राज्यघटनेच्या उद्देश पत्रिकेत स्वातंत्र्य, समता व बंधुभाव असा सुचित केलेला रजकीय ध्येयवाद हा सनातन वृत्ती नाकारत असल्या तरी येणाऱ्या काळात भारतीय नागरिकांचा हा सामाजिक ध्येयवाद होईल. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 3 ऑक्टोबर 1954 रोजी आकाशवाणी दिल्ली केंद्रावरून दिलेल्या भाषणात स्पष्ट केले होते. याची जाणीव ठेवून जनसामान्यांपर्यंत संदेश पोहोचावा. म्हणून फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनने सदरील विषयावर कार्यशाळा आयोजित केली.

उद्घाटनपर मार्गदर्शन करताना सामाजिक कार्यकर्ते म्हणाले की, जीवनाचे तात्विक अधिष्ठान हे विधान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समग्र चळवळीचे सारांश आहे. समता स्वातंत्र्य बंधुता ही तत्वे त्यांनी बुद्धाच्या तत्त्वज्ञानातून स्वीकारलेली आहेत. भारताचे संविधानात अंतर्भूत मूल्यावर आपण प्रतिबद्ध असायला हवे.

प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करताना सामाजिक कार्यकर्ते भारतीय दलित पँथरचे अध्यक्ष लक्ष्मण भुतकर म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीची स्थिती वर्तमानात काय आहे? काय त्यांनी दिलेल्या संदेशाप्रमाणे आपण त्या चालवत आहोत? सर्वांनी एकत्र येऊन आपण त्या पक्ष संघटना चालविल्या पाहिजेत.

याप्रसंगी डॉ. व्ही. एच. कांबळे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे गुरु तथागत बुद्ध, राष्ट्रसंत कबीर व राष्ट्रपिता ज्योतिबा फुले यांचे विचार आपण स्वीकारले पाहिजेत. विलास कटारे म्हणाले की, सरळ सरळ जग हे प्रतिगामी आणि पुरोगामी अशा दोन गटात विभागलेले आहे. आंदोलनाला कृतिशीलतेची जोड असावी लागते. महाड सत्याग्रहात ब्राह्मणांना सामावून घेऊ नये असे जेधे जवळकरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना विनंती केली होती. अशोक मेश्राम म्हणाले की, कुठल्याही व्यक्तीचे त्यांनी स्वीकारलेल्या तत्त्वानुसार त्याचे मूल्यमापन होईल. आर्थिक सुबत्ता आली म्हणजे सामाजिक परिवर्तन होईलच असे नाही. सोशल इंजिनिअरिंग च्या माध्यमातून सामाजिक क्षेत्रात शिरकाव केला पाहिजे.

सुरुवातीला आदर्शांना पुष्प व पुष्पमाला अर्पण करून फाउंडेशन च्या वतीने मान्यवरांचे व उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. सूत्रसंचालन ॲड. विलास रामटेके तर प्रास्ताविक उद्योजक मिलिंद बागुल व आभार अशोक मेश्राम यांनी व्यक्त केले. या कार्यशाळेला बी. बी. मेश्राम, ॲड. विलास रामटेके, डॉ. व्ही. एच. कांबळे, उद्योजक मिलिंद बागुल, अशोक मेश्राम, विलास कटारे, प्रतीक पंचशील, लक्ष्मण भुतकर, अशोक मिसाळ इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते.

शब्दांकन : बी. बी. मेश्राम, संचालक : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र.संपर्क : 8983082128 (Wh), 9421678628 (C) circumference१९६८@gmail.com

# धुळे-सोलापूर महामार्गावर महिंद्र एक्स यू व्ही पलटली अपघातात सात जण जखमी, खड्ड्यामुळे अपघात



**दौलताबाद (जावेद अहेमद)** : धुळे-सोलापूर महामार्गावर महिंद्र एक्स यू व्ही पलटली अपघात सात जण जखमी खडया मुळे अपघात झाले आहे धुळे - सोलापूर महामार्गावर समृद्धी महामार्ग माळीवाडा इंटरचेंज जवळ रस्त्यावरील खड्डे वाचवताना बुधवारी सकाळी १० वाजेच्या सुमारास चारचाकी वाहन पलटी होऊन अपघात घडला यात जनार्दन माधवराव निंबाळकर ,वय-६०,छाया जनार्दन निंबाळकर, वय-५५,पुष्पा नवनाथ तापकोर,वय-४७, श्रद्धा संदीप हिवाळे,वय-३४,उषा अशोक गोरे,वय-५०, शोभाबाई कुंदनसिंग राजपूत,वय-६७, शालिनी शंकरराव माताडे, वय-४७, सर्व रा.श्रद्धा कॉलनी, वाळूज महानगर, ता,जि. छत्रपती संभाजीनगर हे जखमी झाले मिळालेल्या माहितीनुसार वाळूज येथून धुळे सोलापूर महामार्गावरून वेरूळ कडे जाणारी महिंद्रा एक्स यु व्ही क्रमांक एम.एच,४२,के.८२३२ च्या चालकाने रस्त्यावर खड्डे वाचवण्याच्या प्रयत्नात समृद्धी महामार्ग माळीवाडा इंटरचेंज जवळ गाडी पलटी होऊन झालेल्या अपघाता सात जण जखमी झाले जखमींना जगद्गुरु नरेंद्रचार्य संस्थांच्या रुग्णवाहिकेत ग्रामस्थांच्या मदतीने टाकून एमआयडीसी वाळूज येथील एका खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. धुळे सोलापूर महामार्गावर करोडी टोलनाका ते कसाबखेडा फाटा पर्यंत रस्त्यावर मोठे मोठे खड्डे पडले असून रोज छोटे-मोठे अपघात घडत आहे.

# आसेगावं तलावात तरुण बुडाला



**दौलताबाद (जावेद अहेमद)** : दि ०८ बुधवारी रोजी दुपारी एक वाजता दौलताबाद पोलिसांना आसेगावं येथील तलावात एक तरुण बुडाला असल्याची माहिती पोलीस पाटील बाळू कांबळे यांनी दिली.

पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत अग्निशमन दलाला ही माहिती दिली अग्निशमन अधिकारी अशोक खांडेकर यांच्या मार्गदर्शन खाली दीपराज गंगावणे,संग्राम मोरे,दिनेश मुंगसे,छत्रपती केकाण व पोलीस अंमलदार लक्ष्मण गोरे, साहेबराव राठोड, योगेश राऊत, सुनीत पवार यांच्या मदतीने त्याला बाहेर काढ्न्यात आले त्याची ओळख पटली.

त्याचे नाव विशाल मच्छिन्द्र माळे वय २१ वर्ष राहणार आसेगावं तालुका गंगापूर असे आहे त्याला घाटी रुग्णालय येथे उपचारासाठी दाखल केले वैध्यकीय अधिकारी यांनी तपासून मयत घोषित केले विशाल च्या कुटुंबियांनी सांगितले आमचे व्यवसाय मासेमारी आहे.

मासेमारी करून उदरनिर्वाह करतो विशाल हा सकाळी चहा पिऊन तलावत मासेमारी साठी गेला होता त्याने रात्री मासे पकडण्यासाठी जाळे टाकले होते सकाळी मासे पकडण्या साठी गेला होता व त्याला पोहता येत होते दुपार पर्यंत न आल्यावर शोध घेतला असता शेजारी त्याचे साहित्य मिळून आले होते.

त्याचे शव मिळाले त्या ठिकाणी दोन् ते तीन फुटवरून विद्युत तारा गेले आहे कदाचित विद्युत तारेच्या प्रवाह मुळे करंट लागून ही घटना घडल्याचे संशय व्यक्त करण्यात येत आहे विशाल हा कमवतो पुरुष होता त्याला पत्नी, आई, वडील व एक भाऊ आहे त्याचे एक वर्षापूर्वीच लग्न झाले होते त्याला घाटी रुग्णालय येथे उपचारासाठी दाखल केले वैध्यकीय अधिकारी यांनी तपासून मयत घोषित केले

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०९ ऑक्टोबर २०२५


## डॉ. सौ. इं. भा. पाठक महिला महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धा संपन्न



**छत्रपती संभाजीनगर :** येथील डॉ सौ इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालयात डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, तसेच माणिकचंद पहाडे विधी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरमहाविद्यालयीन तायक्वांदो स्पर्धेचे दिनांक ८ ऑक्टोबर २०२५ रोजी तापडिया क्रीडा संकुल येथे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेचे उद्घाटन आंतरराष्ट्रीय जलतरणपटू माननीय आदिती निलंगेकर यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी अध्यक्षस्थानी मराठवाडा लिगल अँड जनरल एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्ष मा.अॅड. कल्पलता पाटील -भारस्वाडकर या उपस्थित होत्या.

या प्रसंगी आंतरराष्ट्रीय तायक्वांदोपटू माननीय लता कलवार, माणिकचंद पहाडे विधी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. अपर्णा कोत्तापल्ले डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्रभारी संचालक व माणिकचंद पहाडे विधी महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाचे संचालक डॉ.सचिन देशमुख , डॉ.सौ.इं. भा.पा. महिला महाविद्यालयाच्या क्रीडा संचालक डॉ. मनिषा वाघमारे, समिती सदस्य डॉ. रमा दुधमांडे तसेच अभ्यास मंडळ सदस्य डॉ. भागचंद सानप, डॉ. राम जाधव तायक्वांदो सचिव सुरेश वाघ (अहिल्यानगर जिल्हा), डॉ प्रशांत तौर, (जालना जिल्हा) डॉ. सुहास यादव, डॉ.सुनील गायसमुद्रे डॉ. मधुकर वाकळे यांची उपस्थिती होती.

उद्घाटन पर मार्गदर्शन करताना मा आदिती निलंगेकर यांनी सांगितले की, तायक्वांदो हा ऑलिंपिक मान्यता प्राप्त खेळ आहे त्यामुळे या क्षेत्रात खेळाडूंना करिअर च्या अनेक संधी उपलब्ध आहेत आत्मविश्वास निर्णयक्षमता व सकारात्मक दृष्टिकोन विकसित करण्याच्या दृष्टीने या खेळाचे महत्त्व त्यांनी प्रतिपादन केले.

स्पर्धेत सहभागी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.अध्यक्षीय समारोप करताना मा. अॅड. डॉ. कल्पलता पाटील -भारस्वाडकर यांनी सांगितले की, तायक्वांदो हा केवळ एक युद्ध कलेचा खेळ प्रकार नसून शरीर, मन आणि आत्मा यांचा समतोल साधणारा व व्यक्तिमत्त्व विकसित करणारा हा खेळ प्रकार आहे,असे सांगून त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून सर्व स्पर्धक खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

स्पर्धेच्या आयोजना मागील हेतू आपल्या प्रास्ताविकातून डॉ.रमा दुधमांडे यांनी सांगितला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अश्विनी शहाणे यांनी केले तर प्रमुख अतिथींचा परिचय कु.सुहानी खोब्रागडे हिने करून दिला. महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या आणि अध्यक्षांच्या हस्ते प्रमुख अतिथींचा सत्कार करण्यात आला.

या स्पर्धे साठी छत्रपती संभाजीनगर जालना बीड उस्मानाबाद जिल्ह्यातील मुलींचे १४ आणि मुलांचे २४ अशा एकूण ३८ संघांनी सहभाग नोंदविला.

## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथे वन्यजीव संरक्षण आणि जनजागृती कार्यक्रम





**उमरगा :** श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथे वन्यजीव सप्ताहानिमित्त "वन्यजीव संरक्षण आणि जनजागृती" या विषयावर ०८ ऑक्टोबर रोजी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश जंगलातील वन्यजीवांचा अधिवास सुरक्षित ठेवून त्यांचे संरक्षण व संवर्धन करणे हा होता.

कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. मनोरंजना निर्मळे यांनी वन्यजीवांचे पृथ्वीवरील महत्त्व सांगताना म्हटले की, "पृथ्वीवर राहण्याचा अधिकार जितका मानवाला आहे तितकाच वन्यप्राण्यांनाही आहे.

त्यांच्या संरक्षणासाठी प्रत्येकाने पुढे येणे आवश्यक आहे."पुढे बोलताना डॉ. निर्मळे म्हणाल्या की वन्यजीव सप्ताह २ ते ८ ऑक्टोबर दरम्यान साजरा केला जातो. भारतातील बंगालचा वाघ, एकशिंगी गेंडा, भारतीय मोर यांसारख्या अद्वितीय प्राण्यांचे संवर्धन करण्यासाठी राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये आणि व्याघ्र प्रकल्पांची निर्मिती करण्यात आली आहे.

तरीदेखील मानवी हस्तक्षेपामुळे वन्यजीवांचे अधिवास धोक्यात आले आहेत, यावरही कार्यक्रमात चर्चा झाली.याप्रसंगी सापांच्या विविध प्रजातींबद्दल माहिती देण्यात आली. परिसरातील सुमारे 20 सापांचे प्रात्यक्षिक दर्शन विद्यार्थ्यांना करून देण्यात आले. साप ओळखणे, साप निसर्गाचा मित्र कसा आहे, तसेच पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले.

रांगोळीच्या माध्यमातून विविध वन्यजीवांची चित्रे साकारून विद्यार्थ्यांनी जनजागृतीचा संदेश दिला. प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हटले की पर्यावरण संतुलनासाठी पृथ्वीवरील सर्वच जीवांचे अस्तित्व सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी संपूर्ण मानवी समूहाची आहे.

यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांनी वन्यजीव संरक्षणासाठी रांगोळीच्या माध्यमातून केलेल्या जनजागृतीचे कौतुक केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पी. एल. सावंत यांनी केले, तर पवन बेलकोने यांनी आभार मानले.

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. अस्वले, विज्ञान विभागाचे उपप्राचार्य डॉ. व्ही. एस. इंगळे, कला विभागाचे उपप्राचार्य डॉ. पी. ए. पिटले, सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्हास्तरीय शालेय टेनिक्वाईट क्रीडा स्पर्धेत इकरा पब्लिक शाळेला रौप्य व कांस्य पदक



**जळगाव :** नुकत्याच श्री छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा क्रीडा संकुल, जळगाव येथे पार पडलेल्या शालेय टेनिक्वाईट क्रीडा स्पर्धेत इकरा पब्लिक शाळेने रौप्य व कांस्य पदक मिळवून यश मिळविले.

इकरा पब्लिक स्कूलने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही क्रीडा स्पर्धेत आपला ठसा उमटवला आहे.

नैसर्गिक वातावरण, सुसज्य क्रीडांगण, मुबलक क्रीडा साहित्य, अनुभवी प्रशिक्षित क्रीडा शिक्षक व डॉ.करीम सालार साहेबांचे अचूक मार्गदर्शन यामुळे क्रीडा स्पर्धेत शाळा उज्वल यश संपादन करत आहे.

सर्व सहभागी व यशस्वी विद्यार्थी आणि क्रीडा शिक्षक श्री आमीर सर यांचे संस्थेचे उपाध्यक्ष डॉ.इकबाल शाह,सचिव एजाज मलिक, प्राचार्य शेख शकील यांनी अभिनंदन केले. शाळेच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. करीम सालार यांनी समाधान व्यक्त केले आहे.


Education of the Day

YCMOU सेंटर कोड : 21187

YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुर्वणसंधी

B.A. (मराठी व उर्दू माध्यम)

M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन

9405109103, 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०९ ऑक्टोबर २०२५


## समृद्धी महामार्गावर दोन अपघात: एक तरुणी ठार, पाच जण जखमी



**बुलढाणा (महेश मुंढे) :** समृद्धी महामार्गावर सोमवारी रात्री उशिरा दोन वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या अपघातांत एक तरुणीचा मृत्यू झाला असून, पाच जण जखमी झाले आहेत. या अपघातांमुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. मात्र, वाहने बाजूला करून वाहतूक पुन्हा सुरळीत करण्यात आली.

पहिला अपघात सीएच नंबर २९६.९०० जवळ घडला. भद्रक (ओडिशा) येथील प्रदीप मुला आणि शिवानंद दास हे त्यांच्या ओडी ०२ DF ३५५३ या कारने जात असताना, समोरून येणाऱ्या NL ०१ AG ५७९३ क्रमांकाच्या ट्रकने त्यांच्या कारला धडक दिली.

धडकेनंतर कार ट्रकने काही अंतर ओढत नेली. यामध्ये दोघे जखमी झाले असून, त्यांच्यासोबतचे सौरभ प्रधान आणि ओसरवरी दास देखील थोड्या अंतरावर जखमी अवस्थेत सापडले. सर्व जखमींना मेहकर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

ट्रकचालक राजेश काळे (वय २४, रा. रिवा, मध्यप्रदेश) घटनास्थळी उपस्थित होता.दुसरा अपघात चॅनल नंबर ३३२.८०० (नागपूर कॉरिडॉर) येथे घडला. केएल ०७ बीजे ३९१५ क्रमांकाच्या कारचे टायर फुटल्याने चालक नयाज पाशा (४२, रा. बेंगळुरू) यांनी ती पहिल्या लेनमध्ये थांबवली होती. ते कारच्या समोर उभे होते.

त्यांच्या सोबत प्रवासी अखिला (५०) आणि सुहाना (१८) हे देखील बाहेर उभे होते. याचवेळी मागून येणाऱ्या GJ ०५ RE ८९८५ क्रमांकाच्या कारने त्यांच्या वाहनास जोरदार धडक दिली.धडकेमुळे सुहाना ही तरुणी पुलाखाली पडून जागीच ठार झाली. चालक नयाज पाशा गंभीर जखमी असून, त्यांना जालना येथील रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

अपघातात धडक देणाऱ्या कारमधील चालक किशोर कुमार (४०, रा. सुरत, गुजरात) आणि इतर पाच प्रवासी सुखरूप आहेत. सिंदखेडराजा पोलिसांनी घटनास्थळी तात्काळ धाव घेतली व वाहने बाजूला करून महामार्गावरील वाहतूक सुरळीत केली.

## महर्षी वाल्मिकी ऋषींची जयंती उत्सवात साजरी



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** वाल्मीक ऋषी हे 'रामायण' या महाकाव्याचे रचयिते आहेत आणि त्यांना आदिकवी म्हणून ओळखले जाते. महर्षी वाल्मीकी हे हिंदू महादेव कोळी समाजातील होते आणि त्यांच्या जीवनातून सत्य,कर्तव्य आणि साहस यांचा संदेश मिळतो.ब्रह्मदेवांच्या आज्ञेने त्यांनी रामायणासारखे महाकाव्य रचले, ज्यामध्ये भगवान श्रीरामाच्या जीवनाचे वर्णन आहे.

महर्षी वाल्मिकी ऋषींच्या जयंतीच्या निमित्ताने उत्सव समिती कोळी समाज सामाजिक सेवा संस्था महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली जयंती उत्साहात साजरी करण्यात आली प्रमुख अध्यक्ष श्री गणेश चकाले साहेब आणि संपूर्ण कार्यकारणी सदस्य व अॅड योगेश सुरडकर मनोज शिंदे व पदाधिकारी यांच्या खास आग्रहाखातर निमंत्रना वरून सह्याद्री आदिवासी ठाकर ठाकूर समाज उन्नती मंडळ महाराष्ट्र राज्य (छत्रपती संभाजी नगर जिल्हा कार्यकारणी सदस्य मंडळ) संचलित 1) महिला कला पथक प्रमुख हरकाबाई महादू गांगड यांच्या नेतृत्वाखाली "कळसुबाई महिला नृत्य गायन वादन कला पथक खोलापुर" काळू कावजी गांगड यांच्या नेतत्वाखाली 2)"भैरवनाथ कांबड नृत्य पथक पुरुषः खोलापूर" यांना बोलावण्यात आले होते.

यावेळी दोन्हीं कला पथकातील पथकातील कलाकारांना प्रोत्साहन स्फूर्ती बळ,ताकत, हिम्मत,जोश मार्गदर्शन सह्याद्री ठाकुर ठाकर समाज उन्नती मंडळ म.राज्याचे प्रमुख पदाधिकारी महाराष्ट्र राज्य सल्लागार सुधाकर मेंगाळ कन्नड आणि संभाजीनगर जिल्हा अध्यक्ष श्री सरीचंद दोरे व जिल्हा खजिनदार यांनी केले.महात्मा ज्योतिबा फुले यांच्या चौकातून प्रथम महर्षी वाल्मिकी ऋषींच्या मूर्तीस शाल श्रीफळ वाढवून पूजन करून मिरवणुकीस ढोल ताशांच्या गजरात प्रारंभ करण्यात आला खोलांपुर येथील महिला व पुरुष कलाकारांनी मिरवणुकी दरम्यान फुगडी नाच मोरघा नाचं, होळी नाच,भोंडया नाच, टिपरी नाच,कांबड नाच ठाकरी नाच पावरी नाच कोळी गीतावर आधारित कोळी नाच मनोरा इत्यादी कला सादर केल्या या मिवणुकीदरम्यान अक्षरशः लहान मुला मुलीं पासून तर तरूण मुले मुलीचं नाहीं तर सत्तरी पार केलेल्या व्यक्तींनी पुढाकार घेऊन पूढे नाचून गावून प्रत्यक्ष पणे भाग घेतला.फुले चौक,निराला बाजार, ते क्रांती चौक अशी मिरवणुक काढण्यात आली क्रांती चौकात येवून मिरवणुकीचे रूपांतर सभेत झाले विषेश मान्यवर पदाधिकारी यांच्या हस्ते उपस्थीत प्रमुख पदाधिकारी पाहूणे यांचा पोलिस अधिकारी राजपूत मॅडम यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.तसेच राजपूत मॅडम यांच्या हस्ते उपस्थीत कळसूबाई महिला नाट्य वाद्य संगीत नृत्य कला पथक भैरवनाथ कांबड नृत्य व टिपरी नृत्य कला पथक खोलापुर यां दोन्हीं टीमचा स्मूर्तीचिन्हं फोटो पुष्पगुच्छ देऊन कृतज्ञता व्यक्त करून सत्कार व सन्मान करण्यात आला.कळसूबाई महिला कांबड फुगडी नृत्य कला पथक खोलापुर कला पथक प्रमुख हरकाबाई गांगड,लक्ष्मीबाई गांगड मंदाबाई गांगड अंजनाबाई गांगड हौसाबाई उघडे,शांताबाई उघडे, रुखाबाई उघडे, मीराबाई उघडे,भारती गांगड,अनिता मधे, मंगाबाई उघडे,सोनाबाई दोरे,सरलाबाई दोरे, नयना उघडे,अंजनाबाई गांगड,सुमन गांगड पूर्णाबाई मधे,सह कलाकार मंजुळाबाई मेंगाळ जनाबाई दोरे,अलका मेंगाळ भैरवनाथ कांबड नृत्य टिपरी नृत्य कला पथक खोलापुर ता. कन्नड जिल्हा संभाजीनगर कला पथक प्रमुख काळू गांगड, नथू गांगड पांडूरंग गांगड पोषू उघडे एकनाथ उघडे बुधा मधे श्रावण गांगड कृष्णा उघडे मारूती गांगड बुधा उघडे चिंतामन खडके राजू उघडे रंगनाथ गांगड मारूती गांगड सह कलाकार भाऊसाहेब आगिवले,भावडू मेंगाळ मावंजी दोरे चिमाजी मधे सुधाकर मेंगाळ.अशाप्रकारे सह्याद्री आदिवासी ठाकर ठाकूर समाज उन्नती मंडळ संचलित कळसुबाई महिला कला पथक भैरवनाथ कांबड नृत्य पथक यांचा अखंडपणे संध्याकाळी ६:०० वाजे पासून तर रात्री १०:०० वाजता कार्यक्रमांची सांगता झाली.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.

कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.

संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०९ ऑक्टोबर २०२५


## मराठीला अभिजात दर्जा मिळण्यामध्ये बोलीभाषांचे मोठे योगदान महत्त्वाचे आहे : डॉ. रमेश सूर्यवंशी



**कन्नड (अरुण थोरात):** श्री दादासाहेब तारे शिक्षण संस्था, अचलपूर द्वारा संचालित स्व. छगनलाल मुलजीभाई कढी कला व विज्ञान महाविद्यालयामध्ये अभिजात मराठी भाषा सप्ताहाच्या निमित्ताने 'अभिजात मराठी' या विषयावर कन्नड येथील प्रख्यात समीक्षक व भाषाअभ्यासक डॉ. रमेश सूर्यवंशी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. मराठी भाषेचा गत दोन हजार वर्षांचा वैभवशाली इतिहास लक्षात घेऊन केंद्र शासनाने मराठी भाषेला भाषेला दि.०३ ऑक्टोबर २०२४ रोजी अभिजात भाषेचा दर्जा प्रदान केला आहे.

त्या अनुषंगाने ०३ ऑक्टोबर ते ०९ ऑक्टोबर या दरम्यान महाराष्ट्र शासनाने 'अभिजात मराठी भाषा सप्ताह' साजरा करण्याचे निर्देश दिलेले आहेत. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. काशीनाथ बऱ्हाटे यांच्या मार्गदर्शनात मराठी विभागाच्या वतीने वरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी अध्यक्ष म्हणून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. काशीनाथ बऱ्हाटे उपस्थित होते. श्री दादासाहेब तारे शिक्षण संस्थेच्या सहसचिव डॉ. जयश्रीताई कुलकर्णी, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या इंग्रजी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. निलेश तारे, अभिजात मराठी भाषा सप्ताहाचे संयोजक डॉ. नरेंद्र पाखरे हे मंचावर उपस्थित होते. सर्वप्रथम कर्मयोगी संत गाडगेबाबा व आदरणीय दादासाहेब तारे यांच्या प्रतिमांचे पाहुण्यांचे हस्ते पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले.

त्यानंतर डॉ. काशीनाथ बऱ्हाटे यांनी प्रास्ताविकातून प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. त्यांनी मराठी भाषेचे प्राचीनत्व व मराठी भाषेची थोरवी वर्णन केली. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळणे ही बाब आपल्या सर्वांसाठी अभिमानाची व गौरवाची आहे असे सांगून त्यांनी मराठी भाषेचे व बोलीचे संवर्धन करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन केले. प्रमुख वक्ते भाषाभ्यासक डॉ. रमेश सूर्यवंशी यांना महाराष्ट्र शासनाचा दोन लक्ष रुपयांचा 'डॉ. अशोक केळकर भाषा अभ्यासक सन्मान पुरस्कार' प्राप्त झाल्याबद्दल त्यांचा महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

आपल्या व्याख्यानातून डॉ. रमेश सूर्यवंशी यांनी मराठी भाषा, प्रमाणभाषा तसेच तिच्या बोली यांचा सहसंबंध उलगडून दाखवला. प्रत्येक बोली ही भाषेची जननी आहे. बोलींमुळेच भाषा समृद्ध होतात. बोली जर नष्ट झाल्या तर भाषा आपोआपच नष्ट होईल असे प्रतिपादन त्यांनी केले. बोली ह्या भाषेच्या वाहिन्या आहेत. प्रत्येकाने आपापल्या बोलीतून सुसंवाद करून व्यवहारात तिचा जास्तीत जास्त वापर करावा असे आवाहन त्यांनी केले. बोलीतील अनेक शब्द आज नष्ट व्हायला सुरुवात झालेली आहे.

त्यामुळे बोलीतील दुर्मिळ शब्दांचा शब्दकोश तयार करण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज आहे. बोलींसोबतच मोडी लिपी आणि इतर लिप्यांचासुद्धा अभ्यास करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. बोलींमुळे भाषा टिकून राहतात, संस्कृतीचा विकास होतो एवढेच नाही तर एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणूनही बोलींना महत्त्व प्राप्त झालेले आहे असे सांगून बोलीच्या विकासासाठी शासन स्तरावरून प्रयत्न होण्याच्या दृष्टीने काही उपाययोजना केल्या पाहिजेत असे मत त्यांनी व्यक्त केले. आज मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने मराठी भाषा ही साातासमुद्रापार जाईल, ती ज्ञानभाषा होईल असा आशावादही त्यांनी व्यक्त केला.

याप्रसंगी महाविद्यालयातील डॉ. राजेश चव्हाण, डॉ. प्रमोद बावणे, डॉ. सुरेंद्र हाडोळे, डॉ. सरिता इंगळे, प्रा. ओमप्रकाश गुर्जर, प्रा. उमेश गायगोले, प्रा. आकाश मेश्राम, प्रा. ऋत्विक हागोणे, प्रा.अमोल घुलक्षे, प्रा. बिसनलाल कासदेकर, प्रा. प्रशांत बागडे, प्रा. सानिया तट्टे, प्रा शीतल खुजे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन मराठी विभागातील डॉ. नरेंद्र पाखरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतलेत.

## धाराशिव जिल्ह्यातील कराटेच्या विद्यार्थ्यांचा गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड अटेम्प्ट लार्जेस्ट कराटे डिस्प्लेमध्ये नोंद... जिल्ह्याचा जगात डंका...




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : उमरगा येथील जिल्हा परिषद हायस्कूलची ग्रिनीज बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थी व क्रीडा शिक्षकाच्या सत्कार करण्यात आला.

श्रेयशी शिंदे, अफसाना नदाफ व क्रीडा शिक्षक महंमदरफी शेख यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष शकुंतला मोरे, केंद्रप्रमुख मुडगडे, मुख्याध्यापक पद्माकर मोरे, केंद्रप्रमुख अमोल थोरे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

तमिळनाडू राज्यातील चेन्नई येथील तांब्रम येथे एस. वाय. बी. ए. टी. महाविद्यालयाच्या प्रांगणात दि.५ ऑक्टोबर २०२५ रोजी झालेल्या मार्शल आर्ट कराटेच्या प्रकारात जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची गिनीज बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये नोंद करण्यात आली असून या करिता विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम घेतले. ही बाब जिल्ह्यासाठी अभिमानाचा विषय आहे.

या कॉलेजच्या प्रांगणात वर्ल्ड कराटे मास्टर्स असोसिएशन द्वारा आयोजित गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड अटेम्प्ट लार्जेस्ट कराटे डिस्प्ले या प्रकारामध्ये सकाळी ७ ते दुपारी अडीच पर्यंत विद्यार्थ्यांचा सहभाग राहिला.

या वर्ल्ड रेकॉर्डची नोंद करण्यासाठी लंडनहून गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचे कॉर्डिनेटर ऋषीनाथ आले होते. यांच्या उपस्थितीमध्ये ९८७ मुलांनी विविध मार्शल आर्ट टेक्निकचे प्रदर्शन करून विविध वयोगटात मुले व मुली देशातील तमिळनाडू, महाराष्ट्र, केरळ, कर्नाटक, तेलंगणा, गोवा, गुजरात, जम्मू काश्मीर, आसाम, उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल आदी राज्यांतील कराटे खेळाडूंची गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंद झाली.

महाराष्ट्रातील धाराशिव जिल्ह्यातून उमरगा येथील जिल्हा परिषद शाळेचे खेळाडू अफसाना लाडली नदाफ (वय १५ वर्ष), श्रेयशी त्रिमूर्ती शिंदे (१५ वर्ष), महात्मा बसवेश्वर विद्यालयातील श्रेया अंकुशे (१४ वर्ष) व डॉ. रामानुजन इंग्लिश स्कूलचे आराध्या प्रभाकर जाधव (९ वर्ष), सानवी बाळासाहेब पाटील (८ वर्ष), आदर्श अनिल कडूरे (८ वर्ष), आयुष युवराज पवार (१२ वर्ष), साहिल महंमदरफी शेख (१४ वर्ष), मुरुम येथील गुरुकुल प्री प्रायमरी इंग्लिश स्कूलचे गीतांशु प्रफुल गव्हाणे (४. ५ वर्ष), देवांश राहुल चिलोबा (६ वर्ष ३), समर्थसिंग सुनील बायस (८ वर्ष), राजवीर बळीराम चौधरी (९ वर्ष) खेळाडू सहभागी झाले होते.

आपल्या क्रीडा प्रकाराचे उत्तम सादरीकरण करून गिनीज बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये नोंद केली. हा अभिमानाचा क्षण म्हणजे विद्यार्थ्यांनी घेतलेले अथक परिश्रम, मेहनत, जिद्द आणि प्रतिभेच्या जोरावर गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नाव नोंदवून शाळेचे, समाजाचे नाव जगभर उज्ज्वल केल्याबद्दल जिल्ह्यातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०८ ऑक्टोबर २०२५


## बगळेदादा

बगळेदादा बगळेदादा
किती स्वच्छ तुझे अंग
सर्वांना आकर्षित करतो
पांढराशुभ्र रंग

शोभून दिसते तुला
उंच उंच मान
सावज पकडण्यासाठी
लावून बसतो ध्यान

आपल्या मित्रांसोबत
भटकतोस रानोमाळ
वृक्षावरती विसावा घेतोस
होता सायंकाळ

भूक तुला लागता
बसतोस नदिकिनारी
सुगावा कुणाचा लागता
घेतोस आकाशी भरारी

पांढऱ्या रंगाचे रहस्य
सांग ना मला राव
एकदा तरी सांग ना
त्या साबणीचे नाव !

**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.९०११५५९१०६**


प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए
मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103


## पी. एम. श्री जिल्हा परिषद प्रशाला, लाडसावंगीची भूमिका अभिनय स्पर्धेत राज्यस्तरासाठी निवड




**छत्रपती संभाजीनगर :** केंद्र शासनाच्या लोकसंख्या शिक्षण प्रकल्पांतर्गत भुमिका अभिनय व लोकनृत्य स्पर्धेत पी.एम.श्री जिल्हा परिषद प्रशाला लाडसावंगी.ता.जि.छ.संभाजीनगर येथील विद्यार्थ्यांचा संघ विभागात प्रथम आणि राज्य स्तरासाठी निवड.

दि.७ ऑक्टोबर २०२५ रोजी छ.संभाजीनगर विभागातील विविध जिल्ह्यातून निवड झालेल्या संघांसाठी विभाग स्तरावर भूमिका अभिनय व लोकनृत्य स्पर्धेचे आयोजन प्रादेशिक विद्या प्राधिकरण, छ.संभाजीनगर येथे करण्यात आले होते.

सदर स्पर्धेत लाडसावंगीच्या विद्यार्थ्यांनी इंटरनेट आणि समाजमाध्यमांचा सुरक्षित वापर या विषयवार विज्ञान शिक्षिका श्रीमती सारिका जैन व श्री सचिन धस यांच्या मार्गदर्शनात उत्कृष्ट अभिनय सादर केला. सध्याच्या परिस्थितीत इंटरनेट आणि समाजमाध्यमांच्या अति वापराचे बळी ठरत असलेले शाळकरी आणि किशोरवयीन मुले आणि त्यांचे बिघडत चाललेले शारीरिक, मानसिक आणि सामाजिक स्वास्थ्य याबाबतीत प्रशालेच्या कु.प्रांजल दाभाडे, निकिता पवार,भूमिका डवणे,नितीन साबळे आणि रोहित दाभाडे या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ठ जनजागृतीपर अभिनय सादर केला.

सारिका जैन व सचिन धस यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.प्रशालेचे मुख्याध्यापक श्री गोरख नजन,श्री गणेश अवचार यांनी यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

प्रादेशिक विद्या प्राधिकरणच्या संचालिका डॉ शैलजा दराडे मॅडम ,जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. आर.डी. कांबळे सर,शासकीय विद्या निकेतन च्या प्राचार्या डॉ राठोड मॅडम, श्रीमती सोनाली बारहाते.. सामाजिक शास्त्र विभाग प्रमुख प्रादेशिक विद्या प्राधिकरण तसेच मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

## एनसीसी विभागाद्वारे भारतीय वायु सेना दिन साजरा




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** दिनांक ८ सप्टेंबर २०२५ रोजी ५३ महाराष्ट्र बटालियन एनसीसी लातूर यांच्या अंतर्गत श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा येथील एनसीसी विभाग द्वारे भारतीय वायु सेना दिन साजरा करण्यात आला.

या प्रसंगी एनसीसी विभागाचे कॅप्टन चिट्टमपल्ले ज्ञानेश्वर यांनी या दिवसाच्या औचित्य साधून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले .८ ऑक्टोबर हा दिवस सैन्य दलातील तीन दलातील एक दल म्हणजे वायु सेना दिवस होय .या दिवसाचा दुसऱ्या जागतिक महायुद्धा पासूनचा ऑपरेशन सिंदुर पर्यंतच्या भारतीय वायु सेना दलातील शौर्याचा , पराक्रमाचा इतिहास सरांनी सांगितला.

भारतीय वायुसेनेनी केलेली प्रमुख ऑपरेशन म्हणजे ऑपरेशन मेघदूत, ऑपरेशन सफेद सागर, ऑपरेशन पुमलाई, ऑपरेशन बालाकोट आणि ऑपरेशन सिंदूर होय या मध्ये ऑपरेशन सफेद सागर १९९९ च्या कारगिल युध्दाच्या वेळी केलेला महत्वपूर्ण अभियान होय .प्रत्येक वर्षी ८ अक्टोबर भारतीय वायु सेना दिवस म्हणुन साजरा केला जातो .

हा दिवस भारतीय वायु सेना चा स्थापना दिन आणि देशासाठी युद्धात ज्यांनी वीर मरण ,बलिदान देणाऱ्या सैनिकांचा हा सम्मान आहे या वर्षी ९३ वां समारोह गाजियाबाद च्या हिंडन एयर फोर्स स्टेशन वर आयोजित केला जात आहे . भारतीय वायु सेना जगातील सर्वात ताकतवर वायु सेना मध्ये अव्वल मानले जाते .

या साठी एनसीसी कैडेटसनी भारतीय सैन्य दलातील वायु सेनेत भरती होऊन देशाची सेवा करावी असे सरांनी आपल्या भाषणात सांगितले . यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ संजय अस्वले , डॉ विलास इंगळे , डॉ पदमाकर पिटले , डॉ हिस्सल , डॉ रेवते , नितीन कोराळे सर उपस्थित होते . कार्यक्रमाचे प्रास्ताविक कॅडेट प्रमोद सुनगार सुत्रसंचलन कॅडेट भोसले रंजना आभार कॅडेट पंकज जमादार यांनी केले .


१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903